हार्दिक, कुलदीपची छाप

‘अव्वल आठ’ फेरीच्या सामन्यात भारताचा बांगलादेशवर ५० धावांनी विजय

वृत्तसंस्था, नॉर्थ साऊंड

हार्दिक पंड्याच्या (२७ चेंडूंत नाबाद ५० धावा) निर्णायक अर्धशतकानंतर कुलदीप यादव (१९ धावांत ३ बळी), जसप्रीत बुमरा (१३ धावांत २ बळी) व अर्शदीप सिंग (३० धावांत २ बळी) यांच्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर भारताने ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या ‘अव्वल आठ’ फेरीच्या सामन्यात बांगलादेशवर ५० धावांनी विजय मिळवला. या विजयानंतर भारताचे दोन सामन्यांनंतर चार गुण झाले असून ते गटात अग्रस्थानी पोहोचले आहेत. त्यामुळे भारत उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भक्कम स्थितीत आहे. सलग दोन सामने गमावल्याने बांगलादेशचे आव्हान जवळपास संपुष्टात आले आहे.

भारताने दिलेल्या १९७ धावांच्या बलाढ्य आव्हानाचा पाठलाग करताना समाधानकारक सुरुवात केली. लिटन दासच्या (१३) रुपात संघाला पहिला धक्का बसला. यानंतर तंझिद हसन (२९) व कर्णधार नजमुल शांतो (४०) यांनी काही चांगले फटके मारले. मात्र, हसन व तौहिद ह्दोय (४) बाद झाल्याने संघाच्या अडचणीत भर पडली. शाकिब अल हसनलाही (११) फार काही करता आले नाही व मग शांतोही बाद झाल्याने संघाची अवस्था ५ बाद १०९ अशी झाली. यानंतर मैदानात आलेल्या रिशाद हुसैन (२४) याने काही आक्रमक फटके मारले, मात्र तोवर उशीर झाला होता व अखेर बांगलादेशला २० षटकांत ८ बाद १४६ धावाच करता आल्या. कुलदीप, बुमरा व अर्शदीपला पंड्या (१/३२) चांगली साथ दिली.

त्यापूर्वी, फलंदाजीला उतरलेल्या भारताला अपेक्षित सुरुवात मिळाली नाही. रोहित शर्मा (२३) बाद झाल्यानंतर विराट कोहलीने (३७) काही आकर्षक फटके मारले. मात्र, तंझिम साकिबने त्याला माघारी धाडले. गेल्या सामन्यातील अर्धशतकवीर सूर्यकुमार यादवला (६) या सामन्यात फारशी चमक दाखवता आली नाही. मग, ऋषभ पंत (३६) व शिवम दुबे (३४) यांनी संघाचा डाव सावरला. दुबेने आपल्या खेळीत तीन षटकार लगावले. यानंतर हार्दिकने अर्धशतक झळकावताना संघाला २० षटकांत ५ बाद १९६ धावसंख्येपर्यंत पोहोचवले. त्याने आपल्या खेळीत चार चौकार व तीन षटकार झळकावले.

अन्य सामन्यात, रॉस्टन चेज (३/१९) व आंद्रे रसेल (३/३१) यांच्या प्रभावी माऱ्यानंतर सलामीवीर शाय होपच्या (नाबाद ८२ धावा) आक्रमक अर्धशतकाच्या बळावर वेस्ट इंडिजने अमेरिकेवर ५५ चेंडू व नऊ गडी राखून विजय मिळवला.

आजचे सामने

ऑस्ट्रेलिया वि. अफगाणिस्तान
● वेळ : पहाटे ६ वा.

अमेरिका वि. इंग्लंड
● वेळ : रात्री ८ वा.

थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, हॉटस्टार ॲप

महिला तिरंदाजी संघाची सुवर्ण हॅट्ट्रिक

अंताल्या (तुर्की) : तिरंदाजीतील कम्पाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेन्नम, आदिती स्वामी, परणीत कौर या महिला संघाने हंगामातील सलग तिसऱ्या विश्वचषक स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. तिसऱ्या टप्प्यातील स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने एकतर्फी लढतीत एस्टोनियाचा २३२-२२९ असा पराभव केला.

स्पर्धेत भारतीय महिला संघाला अग्रमानांकन होते. वैयक्तिक प्रकारात यावेळी प्रथमच महिला विभागातील एकही तिरंदाज पदक मिळवू शकला नाही. मात्र, महिला संघाने सांघिक सुवर्णयश मिळवून हे अपयश काही अंशी खोडून काढले.

नेदरलँड्स-फ्रान्स सामन्याला वादाचे गालबोट

लॅपझिग : गोल करण्याच्या संधी दोन्ही संघांकडून गमाविण्यात आल्यानंतर युरो फुटबॉल स्पर्धेत फ्रान्स व नेदरलँड्स यांच्यातील सामन्याला उत्तरार्धात नेदरलँड्सला नाकारण्यात आलेल्या गोलमुळे निर्माण झालेल्या वादाचे गालबोट लागले. दुखापतीचे गांभीर्य लक्षात घेत आणि योग्य मास्कच्या अनुपलब्धतेमुळे अखेर फ्रान्सने कर्णधार किलियन एम्बापेला या सामन्यात विश्रांती देण्याचा निर्णय घेतला. फ्रान्स आणि नेदरलँड्स दोघांचेही आता दोन सामन्यांतून ४ गुण झाले आहेत. ऑस्ट्रियाचे तीन गुण आहेत. पोलंडची पाटी कोरी आहे. सलग दुसऱ्या पराभवाने त्यांचे आव्हान संपुष्टात आले आहे. आता फ्रान्सचा अखेरचा सामना पोलंड, तर नेदरलँड्सचा सामना ऑस्ट्रियाशी होणार आहे.

एम्बापेच्या गैरहजेरीत अँटोनी ग्रीझमनने नेतृत्व केले. ग्रीझमनला दोन्ही सत्रात गोल करण्याच्या एकेक संधी मिळाल्या होता. पण, त्यावर गोल करण्यात ग्रीझमनला अपयश आले. दोन्ही संघ विजयासाठी आटोकाट प्रयत्न करत असताना नेदरलँड्सच्या झावी सिमोन्सने सामन्याच्या ६९व्या मिनिटाला गोलशून्य बरोबरीची कोंडी फोडली. सामन्यात आघाडी घेतल्याचा आनंद सिमोन्सच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. पण, पंचांनी फ्रान्स गोलरक्षकाजवळील नेदरलँड्सचा खेळाडू डुमफ्रीस ‘ऑफसाइड’ असल्याचा निर्णय दिला. तोवर जल्लोषात असलेले मैदानावरील वातावरण एकदम सुन्न झाले. नेदरलँड्सचा प्रत्येक खेळाडू पंचांशी वाद घालत होता. तेव्हा गोलची वैधता ठरविण्यासाठी ‘वार’ प्रणालीकडे निर्णय सोपविण्यात आला. तिसऱ्या पंचांनी निर्णयासाठी जवळपास पाच मिनिटांचा अवधी घेत गोल अपात्रतेवर शिक्कामोर्तब केले. हा वादग्रस्त प्रसंग वगळता संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांकडून तगड्या बचावाचे प्रदर्शन झाले.

अन्य सामन्यांमध्ये, पोर्तुगालने चमकदार कामगिरी करताना तुर्कीचा ३-० असा पराभव केला. पहिल्या सामन्यात विजयासाठी काहीसे झगडावे लागलेल्या पोर्तुगालने या लढतीत सफाईदार खेळ करताना तुर्कीवर सहज मात केली. तर, जॉर्जिया संघाने चेक प्रजासत्ताकला १-१ असे बरोबरीत रोखून पहिला गुण कमावला.

युरो स्पर्धेत आज अन्य सामने

जर्मनी वि. स्वित्झर्लंड
● वेळ : मध्यरात्री १२.३० वा.

हंगेरी वि. स्कॉटलंड
● वेळ : मध्यरात्री १२.३० वा.

● **थेट प्रक्षेपण** : सोनी स्पोर्ट्स टेन २,३

पेरू-चिलीमध्ये गोलशून्य बरोबरी

अर्लिंग्टन (टेक्सास) : संधीचा फायदा उठविण्यात आलेले अपयश आणि वयाच्या ४१व्या वर्षीही गोलरक्षक म्हणून चिलीच्या क्लाऊडियो ब्राव्होच्या अप्रतिम कामगिरीमुळे कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेतील पेरू व चिली संघांदरम्यानचा सामना गोलशून्य बरोबरीत सुटला.

KONKAN
VELNESHWAR
RATNAGIRI DISTRICT
13.5 Acre
FARM
1 HR FROM CHIPLUN
98191 99000
75071 10000

TATA
TATA POWER

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्र. (CIN): L28920MH1919PLC000567
नोंद.कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई ४०० ००१.
टेली: +९१ २२ ६६६५ ८२८२ **ई-मेल:** tatapower@tatapower.com **वेबसाईट:** www.tatapower.com

१०५वी वार्षिक आमसभा, दूरस्थ ई-मतदानविषयक माहिती आणि रेकॉर्ड दिनांकाची सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (‘कंपनी’) ची १०५वी वार्षिक आमसभा **(‘एजीएम’)** कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२०, दि. ८ एप्रिल, २०२०, क्र. १७/२०२०, दि. १३ एप्रिल, २०२०, क्र. २०/२०२०, दि. ५ मे, २०२०, क्र. ०२/२०२१, दि. १३ जानेवारी २०२१, क्र. २१/२०२१, दि. १४ डिसेंबर, २०२१, क्र. २/२०२२, दि. ५ मे, २०२२, क्र. १०/२०२२, दि. २८ डिसेंबर, २०२२ व क्र. ०९/२०२३, दि. २५ सप्टेंबर, २०२३ **(‘एमसीए परिपत्रके’)** आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे या संदर्भात जारी करण्यात आलेल्या दि. १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२, ५ जानेवारी, २०२३ आणि ७ ऑक्टोबर, २०२३ ची परिपत्रके आणि इतर लागू परिपत्रकांसह (एकत्रितपणे **‘सेबी परिपत्रके’**) वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम २०१३ **(‘अधिनियम’)** च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे पालन करीत एजीएमच्या सूचनेत नमूद कामकाज करण्यासाठी **मंगळवार, दि. १६ जुलै, २०२४** रोजी **दु. ३.०० वाजता (भाप्रवे)** व्हिडीओ कॉन्फरन्स **(‘व्हीसी’)**/ इतर दृक्श्राव्य पद्धतीने **(‘ओएव्हीएम’)** घेण्यात येईल.

१०५व्या एजीएमच्या सूचनेसह एकत्रित वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर **https://www.tatapower.com/ investor-relations/annual-reports.aspx** येथे, बीएसलिमिटेड **(‘बीएसई’)** च्या वेबसाईटवर **www.bseindia.com** येथे आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (‘एनएसई’) च्या वेबसाइटवर **www.nseindia.com** येथे आणि एनएसडीएलच्या वेबसाईटवर **www.evoting.nsdl.com** येथे अपलोड करण्यात आलेला आहे.

वरील एमसीए व सेबी परिपत्रकांचे पालन करीत ज्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेस कंपनी/ लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड - रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट **(‘आरटीए’)**/ नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड **(‘एनएसडीएल’)** कडे आणि/ किंवा सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्विसेस (इंडिया) लिमिटेड **(‘सीडीएसएल’)**कडे, (एनएसडीएल आणि सीडीएसएल एकत्रितपणे **‘डिपॉझिटरीज’**) नोंदविलेले आहेत त्यांना कंपनीच्या आ.व. २४ चा एकत्रित वार्षिक अहवालाच्या लिंकसह १०५व्या एजीएमची सूचना शुक्रवार, दि. २१ जून, २०२४ रोजी पाठविण्यात आलेली आहे. वरील परिपत्रकांच्या अनुषंगाने वार्षिक अहवालाच्या छापील प्रती पाठविण्याची गरज आता राहिलेली नाही. आपले फ़ोलिओ क्रमांक/डीपी आयडी व क्लायंट आयडी नमूद करीत त्यासाठी **investorcomplaints@tatapower.com** येथे किंवा **csg-annualreports@linkintime.co.in** येथे खास विनंती करणाऱ्या सभासदांनाच आ.व. २४ च्या वार्षिक अहवालाची छापील प्रत कंपनीद्वारे पाठविण्यात येईल.

दूरस्थ ई-मतदान:

कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २०, इंस्टीट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या आमसभांवरील सेक्रेटरीयल स्टँडर्ड – २ आणि, सुधारित सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स), रेग्युलेशन २०१५ **(‘लिस्टिंग रेग्युलेशन्स’)** मधील नियम ४४ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०८ चे पालन करीत कंपनीद्वारे आपल्या सभासदांना एजीएममध्ये करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या संदर्भात एजीएमच्या अगोदर तसेच सुरु असताना केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने १०५व्या एजीएममध्ये मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली असून यासाठी कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एनएसडीएल यांची नियुक्ती केलेली आहे.

एजीएमच्या सूचनेत (अ) एजीएमच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान, (ब) व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये सहभाग व सामिल होणे, (क) एजीएमच्या दरम्यान ई-मतदान आणि (ड) ईमेल ॲड्रेस नोंदणी यांवरील समावेशक मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध असून ते कंपनीच्या **https://www.tatapower.com/investor-relations/agm.aspx** या वेबसाईटवरून पाहता व डाऊनलोड करता येतील.

कट-ऑफ दिनांकास म्हणजे मंगळवार, दि. ९ जुलै, २०२४ रोजी ज्या व्यक्तीचे नाव सभासद नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीकडे असलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदविलेले असेल केवळ त्यांनाच एजीएमच्या अगोदर किंवा एजीएम सुरु असताना दूरस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेता येईल. ज्या सभासदांनी एजीएमच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून आधीच मतदान केले असेल त्यांनासुद्धा एजीएममध्ये सहभागी होता येईल, परंतु ज्या ठरावांवर त्यांनी आधीच दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान केलेले असेल त्या ठरावांवर पुन्हा मतदान करता येणार नाही. एजीएमच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान न केलेल्या सभासदांना एजीएम सुरु असताना मतदान करता येईल.

दूरस्थ ई-मतदान सुविधा पुढील कालावधीदरम्यान उपलब्ध असेल:

ई-मतदान प्रारंभ	शुक्रवार, १२ जुलै, २०२४ स. ९.०० वाजेपासून (भाप्रवे)
ई-मतदान समाप्ती	सोमवार, १५ जुलै, २०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल मतदानासाठी खंडित करण्यात येईल. एखाद्या सभासदाने एखाद्या ठरावावर एकदा का मतदान केले की त्यांना ते पुढे बदलता येणार नाही. सभासदांचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास, म्हणजे मंगळवार, दि. ९ जुलै, २०२४ रोजी त्यांच्या कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलामधील वाट्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील.

कंपनी/डिपॉझिटरीजकडे ई-मेल ॲड्रेस नोंदविणे आणि ई-मतदानासाठी युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करणे:

आपला ई-मेल ॲड्रेस कंपनी/ डिपॉझिटरीजकडे नोंदविलेला नसल्यास, आपण एजीएमची ही सूचना आणि आ.व. २४ चा एकत्रित वार्षिक अहवाल प्राप्त करण्यासाठी तो मंगळवार, दि. ९ जुलै, २०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) **https://liiplweb.linkintime.co.in/ EmailReg/Email_Register.html** या लिंकवर क्लिक करून आणि तेथे दिलेल्या सूचनांनुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून तो नोंदवू शकता.

सभासदांना विनंती आहे की ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील समभाग धारण करीत असल्यास आपले ई-मेल ॲड्रेस संबंधित डीपीकडे आणि छापील स्वरूपातील समभाग धारण करीत असल्यास समभागधारकांनी व्यवस्थित भरलेला आणि स्वाक्षरी केलेला नमुना आयएसआर-१ **csg-unit@linkintime.co.in** येथे जमा करून नोंदवावेत. ज्या सभासदांनी आधीच आपले ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले आहेत त्यांना विनंती आहे की त्यांना भविष्यात सूचना/ दस्तावेज/ वार्षिक अहवाल व इतर पत्रव्यवहार त्यांच्या ई-मेल ॲड्रेसवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करून देता यावेत यासाठी तो आपल्या डिपॉझिटरी/आरटीएकडे वैध ठेवावा.

अमूर्त स्वरूपातील अनामती धारण करीत असलेले आणि सूचना पाठविण्यात आल्यानंतर कंपनीचे समभाग अधिग्रहित करणारे आणि कंपनीचे सभासद होणारे आणि कट-ऑफ दिनांकास समभाग धारण करणारे वैयक्तिक समभागधारक एजीएमच्या सूचनेत नमूद पुढील सूचनांचे पालन करू शकतात.

ई-मेल द्वारे सूचना पाठविण्यात आल्यानंतर समभाग अधिग्रहित करणारी आणि कंपनीचे सभासद होणाऱ्या छापील स्वरूपातील समभाग धारण करणारी कुणीही व्यक्ती आणि व्यक्ती नसलेले आणि कट-ऑफ दिनांकास, म्हणजे मंगळवार, दि. ९ जुलै, २०२४ रोजी समभाग धारण करीत असलेले समभागधारक **evoting@nsdl.com** येथे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, एखाद्या व्यक्तीची एनएसडीएलकडे दूरस्थ ई-मतदानासाठी आधीच नोंदणी असल्यास सदर व्यक्तीचा विद्यमान युजर आयडी व पासवर्ड मतदान करण्यासाठी वापरता येईल. ई-मतदानासाठी युजर आयडी व पासवर्ड मिळविण्याच्या/ प्राप्त करण्याच्या पद्धती एजीएमच्या सूचनेत देण्यात आलेल्या आहेत.

कट-ऑफ दिनांकास सभासद नसलेल्या व्यक्तीने एजीएमची ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.

डिपॉझिटरी, म्हणजे एनएसडीएल व सीडीएसएलच्या माध्यमातून लॉगीनशी संबंधित कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी अमूर्त स्वरूपातील अनामती धारण करीत असलेल्या वैयक्तिक समभागधारकांसाठी हेल्पडेस्क.

लॉगीनचा प्रकार	हेल्पडेस्क तपशील
एनएसडीएल	ई-मेल: evoting@nsdl.com/ टेली.: ०२२ – ४८८६ ७०००
सीडीएसएल	ई-मेल: helpdesk.evoting@cdslindia.com/ टेली.: १८००२२५५३३

रेकॉर्ड दिनांक:

एजीएममध्ये सभासदांनी मंजुरी दिल्यास आ.व. २४ करिता सभासदांची पात्रता निश्चित करण्यासाठी रेकॉर्ड दिनांक आहे गुरुवार, दि. ४ जुलै, २०२४. एजीएममध्ये घोषित करण्यात आल्यास हा लाभांश गुरुवार, दि. १८ जुलै, २०२४ रोजी किंवा त्यानंतर देऊ करण्यात येईल.

संचालक मंडळाने एजीएममध्ये आणि दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनिरीक्षक म्हणून मे. पारीख अँड असोशिएट्स, कंपनी सचिव यांच्या श्री. पी.एन. पारीख (सभासदत्व क्र. FCS ३२७, CP क्र. १२२८) किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. मितेश धाबलीवाला (सभासदत्व क्र. FCS ८३३१, CP क्र. ९५११) किंवा त्यांचे अनुपस्थितीत शर्वरी शाह (सभासदत्व क्र. FCS ९६९७, CP क्र. ११७१७) यांची नियुक्ती केलेली आहे.

ई-मतदानाशी संबंधित किंवा व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याच्या संदर्भातील कोणत्याही अडचणींसाठी कृपया **www.evoting.nsdl.com** येथे उपलब्ध असलेले FAQs आणि ई-मतदान युजर मॅन्युअल पाहावे. आपण एनएसडीएलशी ०२२-४८८६ ७००० वरसुद्धा संपर्क साधू शकता किंवा पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक, किंवा श्री. अमित विशाल, सहायक उपाध्यक्ष यांचेशी **evoting@nsdl.com** येथे संपर्क साधू शकता.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएम सुरु असताना करण्यात आलेल्या मतदानाचे निकाल एजीएम संपल्यानंतर फार तर दोन कामकाजाच्या दिवसांत घोषित करण्यात येतील. घोषित करण्यात आलेले निकाल परिनिरीक्षकांच्या अहवालासह कंपनीच्या वेबसाईटवर **www.tatapower.com/investor-relations/agm.aspx** येथे आणि एनएसडीएलच्या वेबसाईटवर **www.evoting.nsdl.com** वर ते घोषित करण्यात आल्यानंतर लगेच टाकण्यात येतील आणि कंपनीचे समभाग जेथे सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्स्चेंजला म्हणजे बीएसई आणि एनएसईला सूचित करण्यात येतील आणि त्यांच्या वेबसाईटवर म्हणजे **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** वर उपलब्ध करून देण्यात येतील.

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड करिता
विस्पी एस. पटेल
कंपनी सचिव
FCS क्र. ७०२१

स्थान : मुंबई
दिनांक : २२ जून, २०२४

TATA
TATA STEEL LIMITED

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 **Email**: cosec@tatasteel.com **Website**: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई–व्होटींग माहितीची सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनीच्या ११७ व्या एजीएम निमंत्रणाच्या सूचनेत (**‘सूचना’**) मांडलेले कामकाज करण्यासाठी टाटा स्टील लिमिटेड **(‘कंपनी’)** च्या सभासदांची ११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (**‘एजीएम’** किंवा **‘सभा’**) सोमवार, १५ जुलै, २०२४ रोजी दु. ०३.०० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॅन्फरन्स (**‘व्हीसी’**)/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (**‘ओएव्हीएम’**) हया प्रकारे घेण्यांत येईल. निगम व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली दिनांक ८ एप्रिल, २०२० दिनांकीत जनरल सर्क्युलर क्र. १४/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकीत १७/२०२०, ५ मे २०२० दिनांकीत २०/२०२० आणि ह्या बाबतीत जारी केलेली नंतरची सर्क्युलर्स व अलिकडचे २५ सप्टेंबर, २०२३ दिनांकित जनरल सर्क्युलर क्र. ०९/२०२३ (एकत्रित उल्लेख **‘एमसीए सर्क्युलर्स’**) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ने जारी केलेली १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२, ५ जानेवारी, २०२३, ६ ऑक्टोबर, २०२३ आणि ७ ऑक्टोबर, २०२३ दिनांकीत सर्क्युलर्स (एकत्रित उल्लेख **‘सेबी सर्क्युलर्स’)** नुसार कंपनीने ज्यांचे ई–मेल ॲड्रेसेस कंपनी/रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट **(‘आरटीए’)** लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड /डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स् कडे नोंदवले आहेत त्या सभासदांना केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शनिवार, २२ जून, २०२४ रोजी कंपनीचा ९ वा एकात्मिक अहवाल व आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी कंपनीच्या ११७ व्या वार्षिक लेखांच्या (**‘एकात्मिक अहवाल’**) साठीच्या वेबलिंक सह सूचना पाठवली आहे.

सूचनासह एकात्मिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com वर उपलब्ध आहे व तो कंपनीचे समभाग जेथे सूचीबध्द आहेत त्या स्टॉक एक्स्चेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड **(‘बीएसई’)** www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड **(‘एनएसई’)** www.nseindia.com हया वेबसाईटस् च्या संबंधित सेक्शन मध्ये सुध्दा पाहता येईल, तेच नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड **(‘एनएसडीएल’)** ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर सुध्दा उपलब्ध आहे.

(ए) सभेपूर्वी रिमोट ई–व्होटींग, (बी) व्हीसी/ओएव्हीएम मार्फत सभेत सामील होणे, (सी) सभेमध्ये ई–व्होटींग, (डी) कंपनीकडे सभासदांच्या ईमेल आयडीजची नोंदणी आणि (ई) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून लाभांश प्राप्त करण्यासाठी कंपनीकडे सभासदांचे अनिवार्य केवायसी दस्तावेज आणि बँक तपशील अद्ययावत करणे यावरील सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे एजीएमच्या सूचनेच्या ‘टीपा’ अनुभागात उपलब्ध आहे. सूचना कंपनीची वेबसाईट https://www.tatasteel.com/investors/integrated-reportannual-report/integrated-report-annual-accounts-2023-24-117th-year-and-related-documents/ येथून पाहता व डाऊनलोड करता येईल.

रिमोट ई–व्होटींग:

कंपनी अधिनियम, २०१३ (**‘अधिनियम’**) चे कलम १०८ सह वाचता प्रत्येकी वेळोवेळी सुधारित कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २०, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वयारमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ आणि दी इन्स्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले जनरल मिटिंग्ज वरील सेक्रेटेरीयल स्टॅंडर्ड (**‘एसएस–२’**) सहवाचता एमसीए/सेबीची अन्य प्रयोज्य सर्क्युलर्स च्या अनुपालनांत कंपनी तिच्या सभासदांना सूचनेत दिलेल्या करावयाच्या कामकाजा संबंधात एजीएम पूर्वी रिमोट ई–व्होटींग तसेच एजीएम मध्ये ई–व्होटींग ची सुविधा पुरवत आहे. कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमातून व्होटींग सुविधांसाठी एनएसडीएल ची नियुक्ती केली आहे.

एजीएममध्ये व एजीएम पूर्वी रिमोट ई–व्होटींग साठीचे तपशिलवार निर्देश एजीएम निमंत्रणाच्या सूचनेच्या ‘टीपा’ विभागात दिले आहेत. सभासदांनी कृपया खालील गोष्टी ध्यानांत ठेवाव्यात:

ए. खालील कालावधीमध्ये रिमोट ई–व्होटींग सुविधा उपलब्ध असेल:

रिमोट ई–व्होटींग सुरु होण्याची तारीख आणि वेळ	**बुधवार, १० जुलै, २०२४ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे)**
रिमोट ई–व्होटींग समाप्तीची तारीख आणि वेळ	**रविवार, १४ जुलै, २०२४ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे)**

त्यानंतर मतदानासाठी रिमोट ई–व्होटींग मॉडयुल एनएसडीएल कडून निष्क्रिय केलं जाईल आणि सभासदांना सदर तारीख आणि वेळेनंतर एजीएम पूर्वी रिमोट ई–व्होटींग मार्फत मत देण्याची अनुमती नसेल.

बी. सभासदांचे मतदान अधिकार **सोमवार, ८ जुलै, २०२४ (‘कट – ऑफ डेट’)** रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणांत असतील. सभासदांना एजीएम मध्ये व्हीसी/ओव्हीएएम प्रक्रियेच्या दरम्यान रिमोट ई–व्होटींग मार्फत मतदानाची सुविधा पुरविण्यात येईल. एजीएम मध्ये सहभागी असलेले सभासद ज्यांनी एजीएम पूर्वी रिमोट ई–व्होटींग द्वारे ठरावांवर त्यांचे अगोदर मतदान केलेले नाही, त्यांना अध्यक्षाद्वारे घोषणा केल्यावर अशा ठरावावर मतदानाचा त्यांचा हक्क वापरणे शक्य होईल. ज्या सभासदानी एजीएम पूर्वी रिमोट ई–व्होटींग द्वारे ठरावांवर त्यांचे मतदान केलेले आहे त्यांना सुध्दा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम मध्ये सहभागी होता येईल, परंतु ठरावांवर पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नसतील.

सी. प्रत्यक्ष स्वरुपात शेअर्स धारण केलेले कोणीही भागधारक किंवा बिगर वैयक्तिक भागधारक ज्यांनी सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केलेले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट–ऑफ–तारीख रोजीस शेअर्स धारण केलेले आहेत, ते evoting@nsdl.com येथे विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करु शकतात. तथापि, जर त्या व्यक्तीने रिमोट ई–व्होटींग करिता एनएसडीएल कडे अगोदर नोंदणी केली असेल तर ते मतदान करण्यासाठी त्यांचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरु शकतात.

डी. जे वैयक्तिक भागधारक सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कट–ऑफ डेट रोजीस डिमॅट माध्यमाने शेअर्स धारण करत असतील तर ते सूचनेत दिल्यानुसार ‘डिमॅट माध्यमाने रोखे धारण करणाऱ्या वैयक्तिक भागधारकाकरिता आभासी सभेत सहभागी होणे आणि ई–मतदानाकरिता लॉगीन मेथड’ मध्ये दिलेल्या पध्दतीचा अवलंब करु शकतात.

ई. कट–ऑफ डेट रोजीस सभासद नसलेल्या व्यक्तीने ही सूचना फक्त माहितीसाठी दिल्याचे समजावे. केवळ कट–ऑफ डेट रोजीस सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नाव असलेली व्यक्तीच एजीएम पूर्वी आणि एजीममध्ये रिमोट ई–व्होटीग ची सुविधा वापरण्यास हक्कदार असतील.

एफ. एजीएम पूर्वी आणि मध्ये रिमोटशी संबंधित कोणत्याही चौकशी/तक्रारींच्या बाबतीत तुम्ही www.evoting.nsdl.com च्या ‘डाऊनलोड’ सेक्शन मध्ये उपलब्ध भागधारकासाठी असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (**‘एफएक्युज**’) आणि भागधारकासाठी ई–व्होटींग युजर मॅन्युअल पाहू शकता किंवा ०२२–४८८६ ७००० वर कॉल करावा किंवा evoting@nsdl.com येथे विनंती पाठवावी किंवा निर्धारित ईमेल आयडी amitv@nsdl.com किंवा pallavid@nsdl.com येथे एनएसडीएल च्या **श्री. अमित विशाल, डेप्युटी व्हाईस प्रेसिडेंट किंवा श्रीम. पल्लवी म्हात्रे, सिनियर मॅनेजर** यांना संपर्क करावा. एनएसडीएल चा पत्ता आहे – ट्रेड वर्ल्ड, ‘ए’ विंग, ४ था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, लोअर परळ, मुंबई – ४०००१३, महाराष्ट्र, भारत.

एनएसडीएल आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हीसेस (इंडिया) लिमिटेड **(‘सीडीएसएल’)** म्हणजेच डिपॉझिटरीज मार्फत लॉगीन शी संबंधित कोणत्याही तांत्रिक समस्येसाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून रोखे धारण करणाऱ्या वैयक्तिक भागधारकांसाठी हेल्पडेस्क:

लॉगईन प्रकार	हेल्पडेस्क तपशील
एनएसडीएल कडील रोखे	evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवून किंवा क्र. ०२२–४८८६ ७००० वर कॉल करुन लॉगीन मध्ये कोणत्याही तांत्रिक समस्यांचा सामना करणारे सभासद एनएसडीएल हेल्पडेस्क शी संपर्क साधू शकतात.
सीडीएसएल कडील रोखे	helpdesk.evoting@cdslindia.com वर एक विनंती पाठवून किंवा १८०० २२ ५५ ३३ वर संपर्क साधून लॉगीन मध्ये कोणत्याही तांत्रिक समस्या असणारे सभासद सीडीएसएल शी संपर्क साधू शकतात.

तपासणी अधिकारी:

कंपनीच्या संचालक मंडळाने एजीएम च्या पूर्वी रिमोट ई–व्होटींग तसेच एजीएम मध्ये ई–व्होटींग प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून मे. परिख अँड असोसिएटस, व्यावसायीक कंपनी सेक्रेटरीज चे श्री. पी एन पारिख (सभासदत्व क्र. एफसीएस : ३२७) किंवा ते नसल्यास श्रीमती जिग्यासा वेद (सभासदत्व क्र. एफसीएस: ६४८८) किंवा त्या नसल्यास, श्री. मितेश धाबलीवाला (सभासदत्व क्र. एफसीएस: ८३३१) ची नियुक्ती केली आहे.

रेकॉर्ड डेट आणि लाभांश:

कंपनीच्या संचालक मंडळाने (**‘मंडळ’**) २९ मे, २०२४ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत रु. १/– च्या सामान्य (सम) भागावर रु. ३.६० च्या (३६०%) लाभांशाची शिफारस केली. पुढे, मंडळाने, एजीएममध्ये सभासदांच्या मंजुरी अधीन, ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लाभांश प्राप्त करण्यास हक्कदार सभासद ठरवण्यासाठी रेकॉर्ड डेट म्हणून **शुक्रवार, २१ जून, २०२४** ही तारीख निश्चित केली आहे. लाभांश एजीएम मध्ये सभासदांकडून मंजूर झाल्यास तो खालीलप्रमाणे **शुक्रवार, १९ जुलै, २०२४** रोजी आणि पासून उद्गम आयकर कपातीच्या **(‘टीडीएस’)** अधीन प्रदान केला जाईल :

- **प्रत्यक्ष पद्धतीने धारण केलेल्या सामान्य शेअर्सच्या संबंधात** : शुक्रवार, २१ जून, २०२४ रोजी कामकाजाची वेळ संपतांना कंपनीकडे नोंदवलेल्या वैध विनंत्यांच्या बाबतीत वैध हस्तांतरण आणि स्थानांतरणास परिणाम स्वरुप दिल्यानंतर सर्व सभासदांना.
- **इलेक्ट्रॉनिक पद्धतीने धारण केलेल्या सामान्य शेअर्सच्या संबंधात** : ह्या कारणास्तव डिपॉझिटरीजनी सादर केलेल्या तपशिलांनुसार शुक्रवार, २१ जून, २०२४ रोजी कामकाजाची वेळ संपतांना शेअर्सच्या सर्व लाभार्थी मालकांना.

टाटा स्टील लिमिटेड
सही/–
पार्वथीसम कांचीनाधम
कंपनी सेक्रेटरी अँड चिफ लिगल ऑफिसर
(कॉर्पोरेट अँड कॉम्प्लायन्स)
एसीएस : १५९२१

२२ जून, २०२४
मुंबई

TATA STEEL

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. इएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४००००० फॅक्स : २२८२२१८७.
महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, अँडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. MAHMAR/2006/19943 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रूपये.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री. विनय अग्रवाल हे गाव मालाड (उत्तर), तालुका बोरिवली च्या सी.टी.एस. क्र. ९३बी आणि ९३बी १ ते ९ धारक जमिनवर बांधकामित पारेख लेन, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथील तन्ना हाईट्स नावाच्या बिल्डिंगमधील ८व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ८०३, मोजमापित ७२५ चौ.फूट चटई क्षेत्र संलग्नित ६७.३८ चौ.मी. चे मालक असल्याचा दावा करीत आहेत सदर त्यांनी अनु.क्र. बीडीआर-५-६५०१-२०१८ अंतर्गत हमीच्या उप-प्रबंधकाच्या कार्यालयासह नोंदणीकृत आणि दिनांक ११ मे, २०१८ रोजीच्या करारा अन्वये प्रमोटर मे. तन्ना हाऊसिंग यांच्याकडून सदर संपादित केला होता, सदर मालक आता सदर फ्लॅट क्र. ८०३ च्या प्रत्यक्ष कब्जात असून सदर फ्लॅटच्या संदर्भामध्ये नामाधिकार स्पष्ट आणि पणनयोग्य आणि कोणत्याही प्रकारच्या सर्व भारांपासून मुक्त प्रत्यक्ष कब्जात, त्वरित आणि कोणत्याही हलगर्जीपणा आणि/किंवा त्यावरील थकबाकी शिवाय सर्व निर्वाह, प्रभार, थकबाकी, देणी, कर इ. भरलेले असल्याचा दावा करीत आहेत आणि आता आमच्या अशीलांना सदर फ्लॅट विक्री, हस्तांतर, अभिहस्तांतरण आणि अभिहस्तांकन आणि सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष कब्जा सुपुर्द करण्यास इच्छुक आहेत.

कोणत्याही व्यक्ती/मंडळ यांना वरील सदर फ्लॅट क्र. ८०३ आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग किंवा विभाग च्या संदर्भामध्ये त्या संदर्भामध्ये कोणत्याही विलेख किंवा दस्तावेज निष्पादित केले असल्यास आणि/किंवा कोणताही दावा किंवा आक्षेप जसे की विक्री, गहाण, विश्वस्त, धारणाधिकार, कब्जा, बक्षीस, वारसाहक्क, सोडुन देणे, भाडेपट्टा आणि अन्यकाही दावे आणि/किंवा सदर मुळ नामाधिकार विलेख आणि दस्तावेज संपादन केले असल्यास सदर आम्हाला त्यावरील कागदोपत्री पूराव्यासह या सूचनेच्या जारीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसे कोणत्याही तशा व्यक्ती/मंडळ द्वारे, कोणत्याही बाबीमध्ये त्यांच्या द्वारे, त्यांच्या करीता आणि/किंवा त्यांच्या पश्चात दावे किंवा मागणी, आक्षेप किवा अडथळे इ. असल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाहीत आणि आमचे अशील सदर शेअर्स आणि युनिट संपादन करण्यासाठी हक्कदार असतील आणि सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष कब्जासह विक्री करीता विक्री विलेख/कराराच्या निष्पादन आणि नोंदणीद्वारे त्यानुसार त्यावरील मुळ नामाधिकार विलेख आणि हस्तांतर प्रपत्र प्राप्त करतील.

दिनांक २३ जुन, २०२४.

ए. एन. एस. लिगल सर्व्हिसेस,
वकील,
डी/१०, पार्ले कॉलनी,
सहकार मार्ग, विलेपार्ले (पू.), मुंबई-४०००५७.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे तमाम जनतेस माझ्या अशिलाच्या वतीने देण्यात येते की, **नैना पुरुषोत्तम उर्फ नैना पुरुषोत्तम रोहिरा**, ज्या सध्या गाव वांद्रे येथील सी.टी.एस. क्र. ई/२८९ धारक आणि प्लॉट क्र. ३६७ धारक जमिनीवरील पांडुरंग व्हिल्ला को-ऑप. सोसायटी लि. (३१-१२-१९८० दिनांकित नो. क्र. बीओएम-एचएसजी-६२४४-१९८०) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीतील **(''सदर सोसायटी'')**, ३६७, लिंकिंग रोड, खार, मुंबई ४०००५२ येथील पांडुरंग व्हिल्ला इमारतीतील मोजमापित अंदाजे १८० चौ.फू. कार्पेट एरिया, तळमजल्यावरील **गॅरेज क्र. १ (''सदर गॅरेज)** च्या संदर्भात २९-०५-१९८५ दिनांकित कराराच्या अनुषंगाने विभिन्न क्र. ७६ ते ८० **(''सदर शेअर्स'')** धारक शेअर प्रमाणपत्र क्र. १६ अंतर्गत सोसायटीच्या सदस्यत्वासह संपूर्ण आणि कायमस्वरुपी ताबेदार आणि मालक आहेत, यांच्या नामाधिकाराची मी तपासणी करीत आहे. **सदर गॅरेज** आणि **सदर शेअर्स** यांचा यांचा यापुढे एकत्रितपणे **'सदर मालमत्ता'** असा उल्लेख करण्यात आला आहे.

सध्याच्या मालकाने माहिती दिली आहे की, सदर मालमत्तेच्या संदर्भातील २९-५-१९८५ दिनांकित करार आणि सदर शेअर्स वाचून आणि वगळून त्यांच्याकडे अन्य कोणतेही विलेख आणि नामांतर दस्तावेज नाहीत. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, कोणतेही दावे, खटले, कारवाया, सुनावण्या, वाद, मागण्या, शंका आणि किंवा जप्ती समाविष्टित, परंतु मर्यादित नसलेल्यासह सदर मालमत्ता कोणत्याही भारापासून मुक्त आहे.

